# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## वित्त व लेखा विभाग

## परिपत्रक

**विषय: सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांस वैयक्तिक लॅपटॉप खरेदीसाठी दिलेल्या कर्ज योजनेपोटी झालेल्या फायद्याबाबत.**

या परिपत्रकाद्वारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांस कळविण्यात येते की, विद्यापीठ सेवकांसाठी लॅपटॉप खरेदी कर्ज योजना बँक ऑफ बडोदा, सेनापती बापट रोड, पुणे यांच्यामार्फत जुलै, २०१४ ते जानेवारी, २०१५ या कालावधीमध्ये व बँक ऑफ महाराष्ट्र पुणे विद्यापीठ परिसर शाखा, यांच्यामार्फत दि.०१/०५/२०१४ ते दि.३०/०४/२०१६ या कालावधीमध्ये राबविण्यात आली होती.

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार उर्वरित ३३१ कायम सेवकांसाठी लॅपटॉप खरेदी कर्ज योजना राबविण्याकरिता सदर योजनेचा फायदा आतापर्यंत सेवकांना काय झाला आहे याचा आढावा घेण्यात यावा असे सूचित करण्यात आलेले आहे.

तरी ज्या सेवकांनी लॅपटॉप खरेदी कर्ज योजनेचा लाभ घेतलेला आहे. सदर सेवकांनी लॅपटॉप खरेदी कर्ज योजनेच्या झालेल्या फायद्याची माहिती वित्त व लेखा विभागाला दिनांक ३० जून, २०१८ पर्यंत लेखी कळवावी, म्हणजे त्यानुसार विद्यापीठ अधिकार मंडळाला प्रस्ताव सादर करता येईल.

(सीए (डॉ.) विद्या गारगोटे)
वित्त व लेखा अधिकारी
अतिरिक्त कार्यभार

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा.क्र. वित्त/२०१८-१९/४२६
दिनांक : १५ जून, २०१८